दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शनिवार दि.६ जून २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २७० | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Saturday 6 June 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 270 | Pages 4 | Rate 4 Rs




# पायाभूत प्रकल्पांमध्ये 'डेडलाईन' न पाळणाऱ्यांना नवे कंत्राट नाही!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश; राज्यातील २० 'इन्फ्रा प्रोजेक्ट्स'चा घेतला आढावा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीसाठी पायाभूत सुविधांच्या (इन्फ्रास्ट्रक्चर) प्रकल्पांची कामे विहित वेळेत पूर्ण होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे कंत्राटदाराला देण्यात आलेल्या कालावधीतच प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी दिल्या. जे कंत्राटदार ठरवून दिलेल्या मुदतीत (डेडलाईन) कामे पूर्ण करणार नाहीत, अशा विलंबाने काम करणाऱ्या कंत्राटदारांना भविष्यात कोणतेही नवीन कंत्राट किंवा काम देऊ नये, असे कठोर निर्देश मुख्यमंत्र्यांनी संबंधित यंत्रणांना दिले. कंत्राटदारांनी प्रकल्पांना विलंब केल्यास देशाचे आणि पर्यायाने राज्याचे मोठे आर्थिक नुकसान होते, त्यामुळे प्रकल्पाच्या पूर्णत्वामध्ये होणारा कोणताही विलंब यापुढे खपवून घेतला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित पायाभूत सुविधा 'मुख्यमंत्री वॉर रूम'च्या बैठकीत राज्यातील २० मोठ्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेताना मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, कुठल्याही परिस्थितीत पायाभूत सुविधांचे प्रकल्प हे तीन ते साडेतीन वर्षांमध्येच पूर्ण झाले पाहिजेत. यापुढे नवीन निविदा प्रक्रिया राबवताना, संबंधित कंत्राटदाराने त्याचे मागील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नेमका किती कालावधी लावला होता, या निकषाचा आवर्जून समावेश निविदा अटींमध्ये करावा, जेणेकरून कामाला गती येईल.धारावी झोपडपट्टी पुनर्विकासाचा आढावा घेताना मुख्यमंत्र्यांनी धारावीमधील स्थानिक उद्योगांना बळ देण्याचे निर्देश दिले. तेथील अनधिकृत किंवा असंघटित अर्थव्यवस्था (इन्फॉर्मल इकॉनोमी) अधिकृत करण्यासाठी येथील उद्योजकांना 'स्टेट जीएसटी'मधून सवलत देण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच, पुनर्विकासाच्या निविदा प्रक्रियेतील अंतर्गत मुद्द्यांसाठी वारंवार मंत्रिमंडळासमोर येण्याची आवश्यकता नसून, यंत्रणांनी संबंधित विभागांशी समन्वय साधून हे विषय मार्गी लावावेत, असे ते म्हणाले. याशिवाय ना. म. जोशी मार्ग, नायगाव आणि वरळी येथील बीडीडी चाळींचा पुनर्विकास गतिमान करण्यासाठी तेथील रहिवाशांना घरभाडे देऊन, सध्याची घरे विनाविलंब ताब्यात घेऊन प्रत्यक्ष काम सुरू करण्याचे आदेश त्यांनी दिले.


### भूसंपादनातील अडचणी दूर करा

**विरार ते अलिबाग या 'मल्टी मॉडेल कॉरिडॉर'च्या प्रगतीसाठी भूसंपादनाची (लँड ॲक्विजिशन) प्रक्रिया अधिक गतिमान करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. या महामार्गामुळे आजूबाजूच्या जमिनींचे मूल्य मोठ्या प्रमाणावर वाढणार असून, या वाढीव मूल्याचा शासनाच्या माध्यमातून कसा उपयोग करून घेता येईल, याचे नियोजन करण्यास त्यांनी सांगितले. या मार्गालगत काही विशेष क्षेत्र निश्चित करून तिथे शासनाने जमिनी उपलब्ध करून द्याव्यात आणि गुंतवणूकदारांच्या माध्यमातून विशिष्ट उद्योगांचा विकास करावा, अशी संकल्पना त्यांनी मांडली.पुण्याचा आढावा घेताना पुणे वर्तुळाकार मार्ग (रिंग रोड) आणि 'मुळा व मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पा'साठी जमीन उपलब्ध करण्याचे आदेश देण्यात आले.**



# मुलीचा गर्भपात करू नका मुलगा मुलगी समान असते

दैनिक वादळ वार्ता
**सेनगाव । प्रतिनिधी**



देशामध्ये अनेक ठिकाणी वंशाला दिवा असावा या म्हणी प्रमाणे अनेक महिलांना मुलीच होतात मुलगा होत नाही या कारणाने गर्भपात केला जातो मुलगी असो की मुलगा असो दोघांना वागणूक समान द्यावी, अनेक महिलांना मुलगा होत नसल्याकारणाने महिला गर्भवती राहिली की तिची सोनोग्राफी केली जाते त्या सोनोग्राफीमध्ये काही डॉक्टर स्पष्टपणे सांगतात की मुलगा आहे की मुलगी आहे मुलगी असली तर तिचा गर्भ नष्ट केला जातो पोटात असलेल्या बाळाला जन्म आधीच मृत्यू घ्यावा लागतो वंशाला दिवा पाहिजे या मनीप्रमाणे सध्याच्या जगामध्ये अनेक नागरिक गर्भपात करत आहेत मुलगा असो की मुलगी असो यावर काही नसते मुलगी असली तर घराची लक्ष्मी घराचं वैभव मानलं जातं एवढेच नव्हे तर लक्ष्मीचं रूप म्हणून नागरिक तिची पूजाही करतात परंतु सध्याच्या काळामध्ये मुलगी म्हणलं की गर्भपातीचे प्रमाण वाढलेले दिसते परंतु जलमत्या मुलाची ही इच्छा असते आईच्या कुशीमध्ये वाढ घ्यावी मोठे व्हावे नऊ महिने नऊ दिवस पूर्ण झाल्यानंतर या दुनियेत आयुष्य काढावं अशी इच्छा मुलगा असो की मुलगी असो याची गर्भामध्ये असती परंतु मुलीचा गर्भ म्हणलं मुलीला वाढण्याऐवजी मरण स्वीकाराव लागत, शासनाने अनेक नियमावली काढली आहे परंतु अनेक ठिकाणी गर्भाची तपासणी करून मुलगी असल्यास तिचा गर्भ पाडल्या जातो, मुलगा असो की मुलगी असो दोघांचा जीव एकच असतो यामुळे अनेक मुलाच्या आई-वडिलांनी गर्भपात करूनही मुला इतकीच जागा मुलीलाही समान द्यावी आणि मुलीतही तितकच समाधानी राहावे, नक्कीच मुलगी बापाची आईची मान उंचावल्या शिवाय राहणार नाही,

# सकळ मानवमात्राला वाट दाखवणारे संत ह.भ.प.दादाहरी महाराज लामकाना

दैनिक वादळ वार्ता
**भोकरदन । प्रतिनिधी**



मौजे धावडा येथे फिरती चतुर्थी वारकरी मंडळ मराठवाडा विदर्भ उपक्रमांतर्गत एक दिवशीय कीर्तन महोत्सव त्यामध्ये कीर्तन सेवा दादा हरी महाराज यांची संपन्न झाली त्यामध्ये सकळ मानवमात्रांना सनमार्ग दाखवणारे एकमेव सकळ संत तुम्ही आम्ही या संसार सागरामध्ये बुडत आहे आणि तुमचा आमचा कळवळा सकळ संतांना येतो त्यामध्ये बुडतहे जन न देखावे डोळा येतो कळवळा म्हणून या उक्तीप्रमाणे जगाला वाट दाखवणारी संत आहे कुत्र्याला गती सहन होत नाही मानवाला प्रगती सहन होत नाही आणि संतांना सकळ माणवमात्राची अधोगती सहन होत नाही म्हणून स्वल्पवाटे चला जाऊ वाचेगावु विठ्ठल तुम्ही आम्ही खेळी मिळी गदारोळे आनंदे या उक्तीप्रमाणे आज प्रत्येकाला कुठले क्षेत्र असू द्या त्या क्षेत्रामध्ये योग्य वाट दाखवण्याची अत्यंत गरज आहे आणि म्हणून या फिरती चतुर्थी उपक्रमांतर्गत दर महिन्याला प्रत्येक गावामध्ये जाऊन सन्मार्ग निर्विष्णिपणा आणि प्रत्येकाच्या जीवनामध्ये संत वाङ्मय विषयी प्रेरणा निर्माण झाली पाहिजे हाच हेतू या उपक्रमाचा आहे त्यामध्ये निष्काम वृत्तीने पंचक्रोशीतील संपूर्ण महाराज मंडळी वारकरी उपस्थित राहून जनजागृती करतात खरंतर या उपक्रमाचे दादा हरी महाराज यांनी खूप कौतुक केले आई-वडिलांची सेवा करावी निर्विष्णिपणाने जीवन जगावे एकमेकांच्या सुखदुःखामध्ये सामील होऊन प्रत्येकाच्या अंतकरणांमध्ये आपुलकी जिव्हाळा निर्माण करावा असं संदेश दादाहरी महाराजांनी दिला धावडा नगरीतील मंडळीने राम रसाचा आनंदच घेतलाच परंतु राम रसाबरोबर अधिकमासाच्या पर्वकाळावरती आमरसाचाही आनंद सकळ वारकऱ्यांना दिला असाही संदेश महाराजांनी कीर्तनाच्या माध्यमातून समाजापुढे ठेवला उपस्थित पंचक्रोशीतील महाराज मंडळी समोरची फिरती चतुर्थी चे श्रीफळ करजगाव ता भोकरदन जी जालना यांना देण्यात आले आभार ज्ञानेश्वर माऊली शेलुदकर यांनी केले.

# ५० वर्षांहून अधिक जुना शिवरस्ता खुला शेतकऱ्यांच्या दळणवळणाला नवी दिशा!

## तहसीलदार अजित दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार डॉ.प्रवीणकुमार वराडे यांच्या आदेशाने महसूल प्रशासनाची यशस्वी कारवाई

दैनिक वादळ वार्ता
**सिंदखेडराजा । प्रतिनिधी**

वडाळी, वाघोरा आणि बोरखेडी जलाल या गावांच्या शिवाराला जोडणारा सुमारे ५० ते ५५ वर्षांपासून अस्तित्वात असलेला शिवरस्ता महसूल प्रशासनाच्या पुढाकारातून आणि शेतकरी बांधवांच्या सहकार्याने दि. २ जून २०२६ रोजी खुला करण्यात आला. या कारवाईमुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या दळणवळणाचा व शेती व्यवस्थापनाचा प्रश्न मार्गी लागला असून कृषी कामांना मोठी गती मिळाली आहे.तहसीलदार अजित दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सह मामलेदार तथा नायब तहसीलदार डॉ. प्रवीणकुमार वराडे यांच्या आदेशानुसार ही कार्यवाही पार पडली. अनेक दशकांपासून वापरात असलेल्या या शिवरस्त्यावरील अडथळे दूर करण्यासाठी महसूल प्रशासनाने पुढाकार घेत संबंधित शेतकरी बांधवांशी समन्वय साधला. दोन्ही बाजूंच्या शेतकऱ्यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याने रस्ता खुला करण्याची प्रक्रिया सुरळीतपणे पूर्ण झाली.

या कारवाईदरम्यान तहसील कार्यालय सिंदखेडराजा तर्फे श्री. विष्णू थोरात, ग्राम महसूल अधिकारी सावखेड तेजन तसेच उपभूमी अभिलेख कार्यालय सिंदखेडराजा तर्फे मारोती थोरवे (मुख्यालय सहाय्यक) आणि श्रीकांत बुलबुले (छाननी लिपीक) उपस्थित होते. संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून महसूल अभिलेखांच्या आधारे आवश्यक कार्यवाही पूर्ण केली.शिवरस्ता खुला झाल्याने बन्सी काकडे, अर्जुन झिरपे, मधुकर काकडे, राजेंद्र झिरपे, विष्णू झिरपे, रामेश्वर काकडे, संदीप मुंडे, रमेश मुंडे, रामेश्वर सांगळे, अक्षय काकडे, बाळू झिरपे, शंकर झिरपे आणि बळीराम झिरपे या शेतकरी बांधवांना थेट लाभ झाला आहे. या शेतकऱ्यांच्या शेतांपर्यंत पोहोचण्यासाठी पूर्वी मोठा वळसा घालावा लागत होता. त्यामुळे शेतीमाल वाहतूक, कृषी अवजारांची ने-आण, खत व बियाणे पोहोचविणे यासाठी अतिरिक्त वेळ आणि खर्च करावा लागत होता.मात्र आता शिवरस्ता खुला झाल्याने बन्सी काकडे, अर्जुन झिरपे, मधुकर काकडे, राजेंद्र झिरपे, विष्णू झिरपे, रामेश्वर काकडे, संदीप मुंडे, रमेश मुंडे, रामेश्वर सांगळे, अक्षय काकडे, बाळू झिरपे, शंकर झिरपे आणि बळीराम झिरपे या सर्व शेतकऱ्यांना शेतात ये-जा करणे अधिक सुलभ झाले आहे. तसेच शेतीमालाची वाहतूक कमी वेळेत आणि कमी खर्चात करता येणार असून कृषी कामेही वेळेवर पूर्ण होण्यास मदत होणार आहे.महसूल प्रशासन, उपभूमी अभिलेख विभाग आणि स्थानिक शेतकरी यांच्यातील समन्वयातून पार पडलेली ही कारवाई ग्रामीण भागातील प्रलंबित शिवरस्ते प्रश्न सोडविण्यासाठी आदर्शवत ठरत आहे. लोकसहभाग आणि प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेमुळे अनेक वर्षांपासूनचा प्रश्न निकाली निघाल्याने संबंधित शेतकरी बांधवांनी समाधान व्यक्त केले असून महसूल प्रशासनाचे आभार मानले आहेत.



# संपादकीय

## आरोग्य आणीबाणी



पृथ्वीचे सरासरी तापमान गेल्या दशकापासून दरवर्षी नवनवे विक्रम मोडीत काढत आहे. सद्यस्थिती पाहता हा उन्हाळा आजवरच्या इतिहासातील सर्वाधिक उष्ण उन्हाळा ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उन्हाळ्यात असह्य उष्ण लहरी, हिवाळ्यात अचानक येणारी थंडीची लाट आणि मान्सूनमध्ये ढगफुटीसदृश वादळी पाऊस हे आता ऋतुचक्राचे कायमचेच विस्कळीत झालेले रूप बनले आहे. हवामान बदलाचा हा मार केवळ निसर्गाच्या नोंदींपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो आपल्या उंबरठ्यापर्यंत येऊन पोहोचला आहे. मानवी आरोग्य, मुके प्राणी, शहरी वन्यजीव आणि महाराष्ट्राचे भौगोलिक भवितव्य या तापमान वाढीच्या विळख्यात पुरते होरपळून निघत आहे.

ध्या देशभरात उन्हाचा पारा सातत्याने नवनवे उच्चांक गाठत असून, उत्तर भारतासह अनेक राज्यांमध्ये भीषण उष्णतेची लाट पसरली आहे. दिल्ली-एनसीआरसह अनेक शहरांमधून समोर येणारी आकडेवारी केवळ अंगाची लाहीलाही करणारी नाही, तर मानवी आरोग्यासाठी एक गंभीर धोक्याची घंटा वाजवणारी आहे. आजवर आपल्याला उन्हाळ्यातील आजार म्हणजे केवळ अस्वस्थता, घाम येणे, थकवा किंवा जास्तीत जास्त 'सनस्ट्रोक' इतकेच माहीत आहे; मात्र यंदा उन्हाळ्याने धारण केलेले रौद्ररूप आणि वैद्यकीय तज्ज्ञांनी दिलेले इशारे पाहता, हा ऋतू आता सार्वजनिक आरोग्य आणीबाणी निर्माण करत आहे. या भीषण हवामानाचा परिणाम थेट 'मज्जासंस्था' आणि दृष्टीवर होत असल्याचे वैद्यकीय अहवालांमधून सिद्ध होत आहे. या पार्श्वभूमीवर, वाढत्या तापमानाचे मानवी शरीरावरील होणारे आघात समजून घेणे आणि त्याविरुद्ध वेळीच व्यापक पावले उचलणे ही काळाची गरज बनली आहे.या बदलत्या आणि अत्यंत आक्रमक बनलेल्या उन्हाळ्याच्या आजारांचे स्वरूप पूर्वीपेक्षा पूर्णपणे भिन्न आहे. दिल्लीच्या आघाडीच्या रुग्णालयांमधील ओपीडीमध्ये केवळ उन्हामुळे आजारी पडणाऱ्या रुग्णांच्या संख्येत तब्बल २० टक्क्यांची मोठी वाढ झाली आहे. सर्वात चिंतेची बाब म्हणजे, या रुग्णांमध्ये ताप, जुलाब किंवा उलट्या यांसारख्या पारंपरिक लक्षणांपेक्षा 'न्यूरोलॉजिकल' संबंधित गंभीर आजारांची गुंतागुंत घेऊन येणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. देशातील ज्येष्ठ न्यूरोलॉजिस्टनी स्पष्ट केल्यानुसार, 'लू' आणि अतिउष्णतेचा थेट संबंध आपल्या मेंदूच्या कार्यप्रणालीशी आहे. मानवी शरीर अंतर्गत तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी एका विशिष्ट मर्यादेपर्यंत संघर्ष करू शकते; परंतु जेव्हा बाहेरील तापमान सातत्याने ४० ते ४५ अंश सेल्सिअसच्या पार जाते आणि व्यक्ती प्रदीर्घ काळ या वातावरणाच्या संपर्कात राहते, तेव्हा शरीराचे हे अंतर्गत संतुलन कोलमडून पडते.अतिउष्णतेमुळे शरीराला मोठ्या प्रमाणावर घाम येतो. या घामाच्या वाटे केवळ पाणीच नाही, तर शरीरातील अत्यंत महत्त्वाचे इलेक्ट्रोलाइट्स वाहून जातात. शरीरात निर्माण होणारी ही पाण्याची तीव्र कमतरता आणि इलेक्ट्रोलाइट्सचे बिघडलेले संतुलन थेट मेंदूच्या रक्तप्रवाहावर परिणाम करते. मेंदूला होणारा रक्तपुरवठा मंदावल्यामुळे किंवा विस्कळीत झाल्यामुळे तंत्रिका तंत्रावर कमालीचा ताण येतो. याचे सद्यस्थितीत ओपीडीमध्ये दिसणारे परिणाम म्हणजे तीव्र डोकेदुखी, सतत चक्कर येणे, व्यक्तीला आजूबाजूच्या परिस्थितीचा अचानक विसर पडणे किंवा मानसिक भ्रम होणे हे आहेत. अनेक कमकुवत रुग्ण, वृद्ध आणि लहान मुले भर उन्हात किंवा पुरेशी हवा नसलेल्या ठिकाणी अचानक बेशुद्ध पडत आहेत. इतकेच नव्हे तर, अतितापमानामुळे मेंदूतील विद्युत लहरींचे नियंत्रण सुटून रुग्णांना झटके येण्याच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. या लक्षणांकडे केवळ उन्हाळ्याचा थकवा म्हणून दुर्लक्ष करणे अत्यंत धोकादायक ठरू शकते; कारण ही न्यूरोलॉजिकल आणीबाणी असून, यामध्ये तत्काळ वैद्यकीय उपचार न मिळाल्यास रुग्णाच्या जीवाला कायमचा धोका निर्माण होऊ शकतो.या महातापमानाचा दुसरा मोठा फटका आधीपासूनच विशिष्ट आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना बसत आहे. मायग्रेन, अपस्मार किंवा नसांच्या जुन्या विकारांनी ग्रस्त असलेल्या व्यक्तींसाठी हा उन्हाळा एका छळासारखा ठरत आहे. अतिउष्णतेचे दिवस आणि त्याहूनही अधिक त्रासदायक असणाऱ्या उष्ण रात्री यामुळे रुग्णांची झोप पूर्ण होत नाही. अनेक भागांत होणारी वीज कपात या त्रासात भर घालत आहे. अपुऱ्या झोपेमुळे आणि सततच्या शारीरिक ताणामुळे मायग्रेनच्या रुग्णांमध्ये डोकेदुखीची वारंवारता आणि तीव्रता कमालीची वाढली आहे. अपस्माराच्या रुग्णांमध्ये झटके येण्याचे प्रमाण उन्हाळ्यात वाढते, कारण त्यांचे शरीर अंतर्गत उष्णतेचा ताण सहन करू शकत नाही. मज्जासंस्थेइतकाच उन्हाचा थेट आणि मोठा मारा आपल्या नाजूक डोळ्यांवर होत आहे. सूर्यप्रकाशातील अतिनील किरणे, हवेतील उष्ण वारे, वाढती धूळ आणि प्रदूषण डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरत आहेत. नेत्ररोग तज्ज्ञांच्या मते, या ऋतूत 'ड्राय आय सिंड्रोम'च्या रुग्णांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. डोळ्यांमधील पाण्याचा थर उन्हामुळे वेगाने सुकतो, ज्यामुळे डोळ्यांची जळजळ होणे, डोळे लाल होणे, सतत खाज सुटणे आणि डोळ्यांवर प्रचंड ताण येणे अशा समस्या उद्भवतात. उष्ण हवेतील धुळीच्या कणांमुळे 'लर्जिक कंजंक्टिव्हायटिस' म्हणजेच डोळे येण्याची साथ पसरत आहे. या वाढत्या संकटाचा सामना करण्यासाठी आता केवळ शासकीय पातळीवरील आपत्ती व्यवस्थापन पुरसे ठरणार नाही, तर प्रत्येक नागरिकाला वैयक्तिक पातळीवर आरोग्याची शिस्त लावावी लागेल. वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी दिलेले सल्ले आता मार्गदर्शक तत्त्वे म्हणून स्वीकारण्याची वेळ आली आहे.

# 'वन्यजीव संरक्षण कायद्याचा भंग'; गडचिरोलीतील टायगर कॉरिडॉरमध्ये खाण प्रकल्पाला परवानगी देण्याचा डाव

## प्रकल्प तात्काळ रद्द करा : आदित्य ठाकरे

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्यातील संरक्षित वाघ मार्गिकेच्या (टायगर कॉरिडॉर) परिसरात खाण प्रकल्पांना परवानगी देण्याचा प्रयत्न सुरू असून हा वन्यजीव आणि पर्यावरणासाठी गंभीर धोका असल्याचा आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी केला आहे. संबंधित खाण प्रकल्प तात्काळ रद्द करून त्या परिसराला अधिकृत टायगर कॉरिडॉर म्हणून घोषित करण्याची मागणी त्यांनी केली.मुंबई येथे पत्रकार परिषदेत बोलताना ठाकरे म्हणाले की, गडचिरोलीतील हेद्री आणि आसपासच्या गावांमध्ये खाण प्रकल्पांना परवानगी दिली जात असल्याची माहिती समोर आली आहे. यापूर्वी मागील महिन्यात लोहा डोंगरी परिसरातही खाण प्रकल्प सुरू करण्याचा प्रयत्न झाला होता. मात्र गडचिरोलीतील अशा महत्त्वाच्या पर्यावरणीय विषयांकडे प्रसारमाध्यमांचे अपेक्षित लक्ष जात नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. ठाकरे यांनी आरोप केला की, हा परिसर ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प आणि इंद्रावती व्याघ्र प्रकल्प यांना जोडणाऱ्या महत्त्वाच्या टायगर कॉरिडॉरचा भाग आहे. अशा संवेदनशील वनक्षेत्रात खाणकामाला परवानगी देणे म्हणजे वन्यजीव संरक्षण कायद्याचे उल्लंघन असून जंगले ठेकेदारांच्या घशात घालण्याचा प्रकार असल्याचे त्यांनी म्हटले.या संदर्भात २८ एप्रिल २०२६ रोजी प्रधान मुख्य वनसंरक्षक (पीसीसीएफ) श्रीनिवास रेड्डी यांना संबंधित जमीन खाणकामासाठी वापरता येईल का, याबाबत विचारणा करण्यात आली होती. त्यानंतर १३ मे २०२६ रोजी पीसीसीएफ कार्यालयाकडून हे क्षेत्र वन्यजीव कॉरिडॉर नसल्याचे पत्र देण्यात आले. एप्रिल आणि मे महिन्यातील पत्रव्यवहारात स्पष्ट विरोधाभास दिसून येत असल्याचा दावा ठाकरे यांनी केला.

एका महिन्यात असा कोणता अहवाल आला की ज्या आधारे हे क्षेत्र टायगर कॉरिडॉर नाही, असे सांगण्यात आले? यामागे कोणाचा दबाव



आहे का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. या प्रकरणी केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्री धर्मेंद्र यादव यांना पत्र लिहून पीसीसीएफ श्रीनिवास रेड्डी यांना निलंबित करण्याची मागणी केल्याचे ठाकरे यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्रात वाघ पाहण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात ताडोबा येथे येतात. मात्र दुसरीकडे वाघांच्या स्थलांतरासाठी महत्त्वाच्या असलेल्या मार्गिकांमध्येच खाणकामाला परवानगी दिली जात असेल, तर त्याचा थेट परिणाम वन्यजीव संवर्धनावर होणार आहे. अशा प्रकल्पांना मंजुरी देण्यापूर्वी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाची (NTCA) परवानगी आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.यावेळी त्यांनी राष्ट्रीय राजकारणावरही भाष्य केले. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्या आंदोलनाचा संदर्भ देत ठाकरे म्हणाले, आमच्या पक्षातील कोणी त्या आंदोलनात सहभागी होणार की नाही, हा मुद्दा गौण आहे. सरकार खरोखरच घाबरलेले नाही, असे म्हणत असेल तर आंदोलनकर्त्यांना शांततेत आंदोलन करू द्यावे. सरकारची भूमिका त्यातून स्पष्ट होईल.गडचिरोलीतील प्रस्तावित खाण प्रकल्प आणि टायगर कॉरिडॉरच्या प्रश्नावरून राज्यातील पर्यावरणीय आणि राजकीय वर्तुळात नव्या वादाला तोंड फुटण्याची चिन्हे दिसत आहेत.

# पक्षाच्या जडणघडणीत आणि पक्षाचा देशभरात विस्तार होण्यासाठी आदरणीय अजितदादांचे मोठे योगदान

## त्यामुळे दादांना समर्पित असा हा वर्धापन दिन साजरा करण्याचे नियोजन-सुनिल तटकरे

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २७ वा वर्धापन दिन बुधवार दिनांक १० जून रोजी साजरा करण्यात येणार असून या वर्धापन दिनाच्या नियोजनासाठी आज मुंबई विभागीय राष्ट्रवादी काँग्रेसची बैठक प्रदेश कार्यालयात पार पडल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी दिली. पक्षाचा वर्धापन दिन राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अनुमतीने आणि पक्षाच्या सर्व वरिष्ठ नेत्यांच्या सहमतीने मुंबई षण्मुखानंद सभागृहात घेण्याचा निर्णय झाल्याचे सुनिल तटकरे यांनी सांगितले. १० जून रोजी दुपारी २ वाजता राज्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते षण्मुखानंद सभागृहात जमा होतील त्यानंतर ३ वाजता कार्यक्रमाला सुरुवात होईल. पक्षाच्या जडणघडणीत आणि पक्षाचा देशभरात विस्तार होण्यासाठी आदरणीय अजितदादांचे मोठे योगदान लाभलेले आहे. त्यामुळे दादांना समर्पित असा हा वर्धापन दिन साजरा करण्याचे नियोजन पक्षाचे सर्व पदाधिकारी करत आहेत. याच आयोजनासाठी ही बैठक घेण्यात आली असे सुनिल तटकरे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. या बैठकीला माजी मंत्री नवाब मलिक, आमदार सना मलिक-शेख, ठाणे जिल्हाध्यक्ष नजीब मुल्ला, प्रदेश



उपाध्यक्ष प्रमोद हिंदूराव, मुंबई कार्याध्यक्ष सिध्दार्थ कांबळे, प्रदेश सरचिटणीस संतोष धुवाळी, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उमेश पाटील, कार्यालयीन सचिव संजय तटकरे, प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी, प्रदेश उपाध्यक्ष बाप्पा सावंत, सहकोषाध्यक्ष संजय बोरगे, मुंबई महिला अध्यक्षा आरती साळवी आणि सर्व जिल्हाध्यक्ष, ठाण्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

# संगमेश्वरमध्ये आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी प्रशासन सज्ज; संगमेश्वर पोलिस ठाण्यात बचाव बोट दाखल

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

संगमेश्वर तालुक्यात संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासनाने तयारी सुरू केली असून संगमेश्वर पोलिस ठाण्यात बचाव कार्यासाठी विशेष बोट दाखल करण्यात आली आहे. लवकरच आपत्कालीन व्यवस्थापना संदर्भात मॉकड्रिलचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. जिल्हा पोलिस अधीक्षक नितीन बगाटे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमेश्वरचे पो, नि,राजाराम चव्हाण यांनी पोलिस दलाची संपूर्ण यंत्रणा सज्ज ठेवली आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन संगमेश्वर पोलिसांकडून करण्यात आले आहे. तसेच पोलिस दल, महसूल प्रशासन आणि इतर संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून ग्रामस्थांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यामुळे पूर, अतिवृष्टी किंवा इतर नैसर्गिक आपत्तींच्या काळात नागरिकांना योग्य प्रतिसाद देता येईल, असा प्रशासनाचा विश्वास आहे. लवकरच होणाऱ्या मॉकड्रिलमध्ये विविध बचाव उपाययोजना आणि आपत्कालीन प्रतिसाद प्रणालीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात येणार आहे. यामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील समन्वय अधिक मजबूत होण्यास मदत होणार आहे.



**रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत उबाठाचे बाळ माने यांनी माघार घेतल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार अनिकेत तटकरे बिनविरोध निवडून आले आहेत .**

# ठाण्यात रंगली हिमालया बेबीकेअरची 'हेल्दी बेबी स्पर्धा'; बालआरोग्याबाबत जनजागृती

## ठाण्यातील समुदाय उपक्रमातून पालक आणि आरोग्य तज्ज्ञ एकत्र

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

हिमालया बेबीकेअर या बेबी केअर ब्रँडने स्माईल फाउंडेशन यांच्या सहकार्याने ठाण्यात 'हेल्दी बेबी कॉन्टेस्ट'आयोजित केली होती. या उपक्रमात माता, बालके, समुदाय आरोग्य कर्मचारी आणि बालसंगोपन तज्ञ एकत्र येऊन सर्वांगीण बालविकास, मातृआरोग्य आणि बालसंगोपनाविषयी जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात आला.या उपक्रमात ५२० पेक्षा जास्त माता आणि त्यांच्या बालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. आरोग्य तज्ञ तसेच स्माईल फाउंडेशनच्या कार्यक्रम पथकाच्या उपस्थितीत हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. बालकांचे मूल्यांकन मोटर स्किल्स, उंची, वजन आणि सक्रियता यांसारख्या विकासात्मक निकषांवर करण्यात आले.या स्पर्धेत विहान डोहाळे, रियांश दुपन, रुही



देसले, ओवी वाघ आणि तन्वी यांनी प्रथम क्रमांक, पार्थी माळी, अधिराज खाकर, हर्षित दळवी, जियांश मोरे आणि रिद्धी यांनी द्वितीय क्रमांक तर विहान मेंगाळ आणि शिवांश मोहपे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांना प्रमाणपत्र आणि हिमालय बेबी गिफ्ट पॅक देण्यात आला. सर्व सहभागींसाठी सहभाग प्रमाणपत्र, माइलस्टोन बुकलेट आणि हिमालय बेबीकेअर सॅम्पल पॅक असलेली गिफ्ट बॅग देण्यात आली.स्पर्धेसोबतच मातांना स्तनपान, बालपोषण, स्वच्छता, लसीकरण वेळापत्रक आणि बालसंगोपनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यामुळे आरोग्यदायी व माहितीपूर्ण पालकत्वाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. हिमालया वेलनेस कंपनीचे बेबीकेअर विभागाचे संचालक चक्रवर्ती एन. व्ही.* म्हणाले, बाळाच्या आयुष्यातील सुरुवातीची वर्षे ही विकासासाठी अत्यंत महत्त्वाची असतात. 'हेल्दी बेबी स्पर्धेच्या 'च्या माध्यमातून पालकांना आवश्यक वैद्यकीय माहिती आणि साधने उपलब्ध करून देणे हा आमचा उद्देश आहे. स्थानिक संस्थांसोबत काम करताना आम्ही सुरक्षित, सौम्य आणि माहितीपूर्ण बालसंगोपनाचा संदेश तळागाळापर्यंत पोहोचवत आहोत.तर स्माईल फाउंडेशनच्या 'स्वाभिमान' कार्यक्रमाच्या प्रमुख सरिता प्रधान म्हणाल्या, मातृ व बालआरोग्य बळकट करण्यासाठी प्रारंभिक पोषण, योग्य काळजी आणि जागरूकता अत्यंत आवश्यक आहे.

# दिव्यात महागाई विरोधात ठाकरे शिवसेनेचे निषेध आंदोलन

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार तसेच कल्याण लोकसभा संपर्कप्रमुख गुरुनाथ खोत व कल्याण जिल्हाप्रमुख अभिजीत सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कल्याण ग्रामीण विधानसभा उपजिल्हाप्रमुख ड. रोहिदास मुंडे व दिवा शहरप्रमुख सचिन पाटील यांच्या नेतृत्वाखाली आज दिवा शहरात वाढत्या महागाई विरोधात जोरदार निषेध आंदोलन करण्यात आले. केंद्र व राज्य सरकारच्या जनविरोधी धोरणांमुळे सर्वसामान्य नागरिकांवर महागाईचे मोठे संकट ओढवले आहे. पेट्रोल, डिझेल, गॅस, अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू तसेच दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या वाढत्या किंमतींमुळे सामान्य नागरिकांचे जीवन अत्यंत कठीण झाले आहे. या वाढत्या महागाईविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने सरकारचा निषेध नोंदविण्यात आला. आंदोलन प्रसंगी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली तसेच सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांकडे तात्काळ लक्ष देण्याची मागणी करण्यात आली. वाढती महागाई नियंत्रणात आणावी, जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती कमी कराव्यात आणि जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी आंदोलन कर्त्यांनी केली. प्रसंगी उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख, शाखाप्रमुख, उपशाखाप्रमुख, गटप्रमुख, महिला पदाधिकारी तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व पदाधिकाऱ्यांनी व शिवसैनिकांनी एकजुटीने सहभागी होत महागाईविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.



# रुजू होताच सूर्यवंशींचा दणका; पिशोर पोलिस यांच्या कारवाईने वाळू माफियांचे धाबे दणाणले

## पिशोर पोलिसांची सावरगाव परिसरात धडक मोहीम; ट्रॅक्टर-ट्रॉलीसह अवैध गौण खनिज जप्त,वाळू माफियांमध्ये खळबळ

दैनिक वादळ वार्ता

**पिशोर । प्रतिनिधी**

पिशोर पोलीस ठाण्याचे नव्याने पदभार स्वीकारलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी यांनी रुजू होताच अवैध धंद्यांविरोधात कठोर भूमिका घेत कारवाईचा धडाका लावला आहे. पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच त्यांनी अवैध गौण खनिज वाहतुकीविरोधात प्रभावी मोहीम राबवत तब्बल ७ लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्यांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे.दिनांक ३ जून २०२६ रोजी पिशोर पोलीस ठाण्याचे कर्मचारी अवैध धंदे प्रतिबंधक गस्त घालत असताना सावरगाव परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध वाळू वाहतूक सुरू असल्याची गोपनीय माहिति पोलिसांना प्राप्त झाली. माहितीची गंभीर दखल घेत सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक विश्वजीत फरतळे यांच्या नेतृत्वाखाली गणेश कवल, मच्छिंद्र देवरे व त्यांच्या पथकाने पंचांसमक्ष सापळा रचून सावरगाव येथील खेवोबा महाराज मंदिराकडून येणाऱ्या मार्गावर नाकाबंदी केली. नाकाबंदीदरम्यान एक ट्रॅक्टर-ट्रॉली संशयास्पदरीत्या येताना दिसून आली. पोलिसांनी वाहन अडवून चौकशी केली असता चालकाने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र सखोल चौकशीनंतर वाहनाचा मालक व त्यावेळी उपस्थित असलेला रुपनिल प्रभाकर सोळुंके (वय २४, रा. चिमणापूर, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर) असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर पंचांसमक्ष वाहनाची तपासणी करण्यात आली असता ट्रॅक्टर-ट्रॉलीमध्ये अंदाजे एक ब्रास अवैध वाळू आढळून आली. संबंधितांकडे वाळू वाहतुकीसाठी आवश्यक असलेली कोणतीही वैध परवानगी अथवा शासकीय कागदपत्रे उपलब्ध नसल्याने पोलिसांनी तात्काळ कारवाई करत वाळूसह ट्रॅक्टर आणि ट्रॉली जप्त केली.




या कारवाईत अंदाजे सहा हजार रुपये किमतीची एक ब्रास वाळू, सात लाख रुपये किमतीचा स्वराज ७४४ एक्सटी ट्रॅक्टर आणि पन्नास हजार रुपये किमतीची लाल रंगाची ट्रॉली असा एकूण सात लाख छप्पन्न हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी संबंधित आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) तसेच गौण खनिज अधिनियमातील कलम २१(१), २१(२), २१(३), २१(४) आणि २१(५) अन्वये पिशोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी संजय दराडे करीत आहेत.

पिशोर पोलीस ठाण्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर अवैध धंद्यांविरोधात शून्य सहनशीलतेची भूमिका घेतल्याचा संदेश एपीआय सूर्यवंशी यांनी या कारवाईतून दिला आहे. विशेष म्हणजे, पदभार स्वीकारल्यानंतरच्या सुरुवातीलाच झालेल्या या मोठ्या कारवाईमुळे परिसरातील अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, आगामी काळात अशा कारवायांची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


# आदिनाथबाबत बागलांनीच उत्तर द्यावे अजित विघ्ने यांनी उगाचच खलबत्त्यात डोके घालू नये : सुनील तळेकर

## आदिनाथ कारखान्याच्या कारभारावरून पुन्हा राजकीय आरोप प्रत्यारोप; बागल आणि शिंदे गटांवर तळेकरांचा निशाणा

दैनिक वादळ वार्ता

**सोलापूर (प्रतिनिधी)**

आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या मागील कारभारावरून राजकीय वातावरण पुन्हा तापले असून आमदार नारायण आबा पाटील गटाचे प्रवक्ते सुनील तळेकर यांनी उपसभापती अजित विघ्ने यांच्यावर जोरदार टीका केली आहे. आदिनाथ कारखान्याच्या कारभाराबाबत विचारलेल्या प्रश्नांना बागल गटानेच उत्तर देणे अपेक्षित असताना अजित विघ्ने यांनी विनाकारण या वादात उडी घेतल्याचा आरोप तळेकर यांनी केला आहे. काल आमदार नारायण आबा पाटील गटाकडून आदिनाथ कारखान्याच्या मागील कारभारासंदर्भात बागल गटावर गंभीर आरोप करण्यात आले होते. मात्र या आरोपांचे खंडन बागल गटाकडून न होता माजी आमदार संजयमामा शिंदे गटाकडून उपसभापती अजित विघ्ने यांनी प्रत्युत्तर दिले. यावर प्रतिक्रिया देताना सुनील तळेकर यांनी विघ्ने यांच्यावर थेट निशाणा साधला.



आम्ही ज्या प्रश्नांची उत्तरे मागितली ती बागल गटाने द्यायला हवी होती. मात्र अजित विघ्ने यांनी बागल कुटुंबाचे राजकीय वकीलपत्र स्वीकारल्याप्रमाणे भूमिका घेतली आहे. दुसऱ्यांच्या वादात विनाकारण मध्यस्थी करून स्वतःसाठी डोकेदुखी निर्माण करून घेण्याला मराठीत उगाचच खलबत्त्यात डोके घालणे असे म्हणतात. अजित विघ्ने यांच्या भूमिकेतून याच म्हणीची प्रचीती येत आहे, असा टोला तळेकर यांनी लगावला. उपसभापती पदाची प्रतिष्ठा जपण्याचा सल्ला देताना तळेकर म्हणाले की, बागल गटाच्या पाठिंब्याने मिळालेल्या पदासाठी एखाद्या राजकीय प्रवक्त्याप्रमाणे भूमिका घेणे योग्य नाही. आदिनाथ कारखान्याच्या अधोगतीस जबाबदार कोण, याबाबत बागल गटाच्या नेतृत्वानेच स्पष्टीकरण द्यावे. जर शिंदे आणि बागल गटांची भूमिका एकच असेल तर त्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन आदिनाथ कारखान्याच्या इतिहासावर खुलासा करावा. आदिनाथ कारखान्याबाबत आमदार नारायण आबा पाटील यांची भूमिका सुरुवातीपासून स्पष्ट असल्याचे सांगताना तळेकर म्हणाले की, कारखाना सभासदांच्या मालकी हक्कात राहावा आणि पुन्हा उर्जितावस्थेत यावा, यासाठी ते सातत्याने संघर्ष करत आहेत. कारखान्याच्या प्रश्नावर आंदोलनाची वेळ आली तरी मागे हटणार नसल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.तळेकर यांनी पुढे आरोप केला की, आदिनाथ कारखाना कर्जाच्या खाईत लोटण्यास बागल गटच जबाबदार आहे. दुसरीकडे कारखाना चालवता आला नाही म्हणून विकून टाकणारे आणि कारखान्याच्या बंद अवस्थेस कारणीभूत ठरलेले बागल व शिंदे गट आज एकमेकांची बाजू सांभाळताना दिसत आहेत. ही बाब सभासदांच्या लक्षात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले.अजित विघ्ने यांनी मागील सतरा वर्षांच्या आदिनाथ कारखान्याच्या कारभारावर खुलेपणाने भाष्य केले तर त्यांचे उपसभापती पद एका तासात धोक्यात येईल, असा दावा करत तळेकर यांनी आणखी एक राजकीय टोला लगावला. आपले पद टिकवण्यासाठीच अजित विघ्ने बागल गटाची बाजू मांडत आहेत,अशी टीकाही त्यांनी केली.दरम्यान, आदिनाथ कारखान्याच्या मुद्द्यावरून सोलापूर जिल्ह्यातील सहकार आणि राजकारण पुन्हा एकदा ढवळून निघण्याची चिन्हे दिसत असून येत्या काळात या वादाला आणखी धार चढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# हुमणी अळीविरोधात कृषी विभागाची मोहीम वाशिंबेतील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

दैनिक वादळ वार्ता

**सोलापूर । प्रतिनिधी**

पिकांचे हुमणी अळीपासून संरक्षण व्हावे आणि शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टळावे या उद्देशाने कृषी विभागाच्या वतीने मौजे वाशिंबे येथे हुमणी अळी नियंत्रण सापळा मोहिमेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला परिसरातील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. या मोहिमेस करमाळा तालुक्याचे तालुका कृषी अधिकारी राजेंद्र नेटके, मंडल कृषी अधिकारी अनिल चव्हाण, उपकृषी अधिकारी महेश काळे, सहाय्यक कृषी अधिकारी हरी दळवी, केशव मोरे, आशिक तांबोळी, सागर होरकळ यांच्यासह गावातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी तालुका कृषी अधिकारी राजेंद्र नेटके यांनी हुमणी अळीच्या प्रादुर्भावामुळे विविध पिकांचे होणारे नुकसान, त्यावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच नियंत्रण सापळ्यांचा प्रभावी वापर याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. हुमणी अळीचा प्रादुर्भाव वेळेत ओळखून योग्य उपाययोजना केल्यास पिकांचे मोठे नुकसान टाळता येते, असे त्यांनी सांगितले.कृषी विभागाच्या या उपक्रमाचे शेतकऱ्यांनी स्वागत करत मार्गदर्शनाचा लाभ घेतला. तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांना आणि मोहिमांना सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.या मोहिमेमुळे शेतकऱ्यांमध्ये हुमणी अळी नियंत्रणाबाबत प्रभावी जनजागृती निर्माण झाली असून पिकांचे संरक्षण आणि उत्पादनवाढीसाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केले.



# नागरिकांच्या सहकार्याने शांतता व सुरक्षिततेला प्राधान्य;नव्या ठाणेदारांची ग्वाही

दैनिक वादळ वार्ता

**वर्धा । प्रतिनिधी**

सावंगी (मेघे) पोलीस स्टेशन येथे नव्याने रुजू झालेले ठाणेदार विनोद गिरी यांची पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते राहुल मून व संजीव वाघ यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. भेटीदरम्यान सावंगी (मेघे) परिसरातील कायदा व सुव्यवस्था, नागरिकांच्या सुरक्षेशी संबंधित प्रश्न तसेच विविध सामाजिक विषयांवर चर्चा करण्यात आली. नागरिक आणि पोलीस प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक दृढ होऊन परिसरात शांतता व सुरक्षिततेचे वातावरण कायम राहावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.



यावेळी ठाणेदार विनोद गिरी यांनी नागरिकांच्या सहकार्याने कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावी करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. जनतेच्या समस्या तत्परतेने सोडविणे, लोकाभिमुख पोलीस व्यवस्था निर्माण करणे आणि समाजातील सर्व घटकांशी समन्वय ठेवून काम करणे याला प्राधान्य दिले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते राहुल मून व संजीव वाघ यांनी ठाणेदार गिरी यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. सावंगी (मेघे) परिसरात शांतता, सुरक्षितता आणि सामाजिक सलोखा कायम राखण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची भूमिकाही त्यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी पोलीस प्रशासन आणि समाज यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक दृढ करण्यावर भर देण्यात आला.

# बार्शीत पत्रकारावर घरात घुसून भ्याड हल्ला डिजिटल मीडिया पत्रकार संघाचा तीव्र निषेध

## खाण माफियांचा उच्छाद: आठ दिवसांत कठोर कारवाई न झाल्यास राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा


दैनिक वादळ वार्ता

**बार्शी । प्रतिनिधी**

सत्य उघड करणाऱ्या पत्रकारितेवर पुन्हा एकदा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना बार्शीत घडली आहे. बेकायदेशीर दगड उत्खननाचे वार्तांकन केल्याच्या रागातून दैनिक पुण्यनगरी चे बार्शी तालुका प्रतिनिधी प्रशांत खराडे यांच्यावर घरात घुसून जीवघेणा हल्ला करण्यात आल्याचा आरोप असून, या घटनेचा डिजिटल मीडिया पत्रकार (संघ) असोसिएशन , सोलापूर तसेच बार्शीतील पत्रकारांनी तीव्र निषेध केला आहे.

या प्रकरणातील आरोपींवर तातडीने आणि कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अन्यथा आठ दिवसांत राज्यव्यापी आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा पत्रकार संघटनांनी बार्शीचे प्रांत अधिकारी (उपविभागीय अधिकारी) यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३१ मे २०२६ रोजी प्रशांत खराडे यांनी पत्रकारितेच्या कर्तव्याचा भाग म्हणून एका दगड खाणीतील कथित बेकायदेशीर उत्खननाचे छायाचित्रण केले होते. ही माहिती संबंधित कार्यालयाकडे पाठविल्यानंतर संतप्त झालेल्या सचिन ऊर्फ बाळू जाधव याने त्यांच्या घरात घुसून मारहाण केली आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. या घटनेप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पत्रकार संघटनांच्या मते, हा हल्ला केवळ एका पत्रकारावर नसून लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर झालेला हल्ला आहे. समाजातील गैरप्रकार उघड करणाऱ्या पत्रकारांना लक्ष्य करण्याची प्रवृत्ती वाढत असून, अशा घटनांमुळे स्वतंत्र पत्रकारितेलाच धोका निर्माण होत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली.



निवेदनात बार्शी परिसरात यापूर्वीही पत्रकारांना धमकावण्याचे प्रकार घडल्याचा उल्लेख करण्यात आला असून, वेळेवर आणि कठोर कारवाईच्या अभावामुळे गुन्हेगारांचे मनोबल वाढत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सत्य मांडणाऱ्या पत्रकारांचा आवाज दडपण्याचा कोणताही प्रयत्न पत्रकार संघटना सहन करणार नाहीत, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन आरोपींवर कठोर कारवाई करावी. अन्यथा बार्शीसह राज्यभरातील पत्रकार संघटना एकत्र येऊन व्यापक आंदोलन छेडतील, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नास प्रशासन जबाबदार राहील, असेही नमूद करण्यात आले.

यावेळी डिजिटल मीडिया पत्रकार (संघ) असोसिएशनचे जिल्हा पश्चिम अध्यक्ष विनोद ननवरे, उपाध्यक्ष विजय कोरे, सचिव संजय बोकेफोडे, बार्शी शहर अध्यक्ष गणेश शिंदे, बार्शी ग्रामीण अध्यक्ष संतोष कानगुडे, महिला आघाडी प्रमुख राजश्री गवळी, मार्गदर्शक रमेश गायकवाड, रमण कारंजकर, कायदेशीर सल्लागार ॲड. शंकर ननवरे यांच्यासह जिल्हा, शहर व ग्रामीण कार्यकारिणीचे पदाधिकारी आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.या निवेदनाच्या प्रती राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, सोलापूर जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्या आहेत.

# अमली पदार्थांविरोधात जिल्हाधिकाऱ्यांनी आवळला फास

## पोलीस व औषधी प्रशासनाला दिले कडक कारवाईचे निर्देश

दैनिक वादळ वार्ता

**परभणी । प्रतिनिधी**

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सुरु असलेल्या अंमली पदार्थांच्या वापराला आळा घालण्यासाठी पोलीस विभाग आणि अन्न व औषध प्रशासन विभागाने संयुक्तपणे प्रभावी कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिले आहेत. जिल्हास्तरीय नार्को को-ऑर्डिनेशन समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

महत्वपूर्ण अशा या बैठकीस पोलीस, आरोग्य, शिक्षण, अन्न व औषध प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क, डाक विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

अंमली पदार्थांचा प्रश्न हा सामाजिक आरोग्याशी संबंधित गंभीर विषय असून त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याची नितांत गरज असल्याचे जिल्हाधिकारी संजय सिंह चव्हाण यांनी सांगितले. बैठकीत अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यांतर्गत दाखल गुन्हे, जप्तीची कारवाई आणि प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेण्यात आला असून याविषयी अधिकाधिक कटाक्ष राखत कर्तव्यात कोणतीही कसूर होता कामा नये असे जिल्हाधिकारी चव्हाण यांनी कठोर निर्देश दिले आहेत.दरम्यान, परभणी शहरासह संपूर्ण जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या तस्करीचे हैदोस घातला असून त्यावर तातडीने आळा घालण्याची नितांत गरज असल्याचे वृत्तान्त ज्येष्ठ पत्रकार दत्तात्रय कराळे यांनी प्रकाशित करुन शासन व प्रशासनाचे लक्ष वेधले होते. याच अंमली पदार्थांच्या तस्करीच्या विळख्यात आजची तरुणाई अखंडपणे गुरफटली गेली असून परिणामी संपूर्ण जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा अंमली



पदार्थांच्या तस्करीतून निर्माण भ्रष्टाचाराने पोखरली गेला असल्याची वास्तव स्थिती सुध्दा श्री.कराळे यांनी विषद केली आहे.

नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो (एसीबी)चे मुंबई विभागाचे माजी संचालक आणि. बॉलीवूडशी संबंधित ड्रग्ज प्रकरणातील (आर्यन खान प्रकरणी) धडाकेबाज कामगिरीमुळे संबंध देशभरात चर्चेत असलेले अधिकारी समीर वानखेडे यांनी नुकताच अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम याचे दोन प्रमुख तस्कर असलेल्या खतरनाक गुंडांच्या शिताफीने सापळा रचून मुसक्या आवळल्या आहेत. त्यामुळे संपूर्ण गुन्हेगारी क्षेत्रात प्रचंड खळबळ माजली आहे. हे खळबळजनक वृत्त सुध्दा प्रकाशित करत श्री.कराळे यांनी त्याचाच एक भाग ठरत असलेल्या परभणी जिल्ह्यातही दिवसेंदिवस वाढणाऱ्या तस्करीतून गुन्हेगारांनी मोठा हैदोस घातल्याचा व त्याला बळी पडत असलेल्या तरुणाईच्या आयुष्याशी निर्माण गंभीर धोक्याबाबतही शासन व प्रशासनाचे लक्ष वेधले होते. किंबहुना त्यासाठीच जिल्हाधिकारी संजय सिंह चव्हाण यांनी संवेदनशील ठिकाणी विशेष तपासणी मोहीम राबविणे, पानटपऱ्यांची तपासणी करणे, औषधांचा गैरवापर रोखण्यासाठी औषधी दुकानांची नियमित तपासणी करून संशयित प्रकरणांमध्ये पोलीस आणि अन्न व औषध प्रशासन विभागाने संयुक्तपणे कारवाई करावी, अशा सूचनाही दिल्या आहेत. एकूणच काय तर हा संभाव्य धोका ध्यानी घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी अंमली पदार्थांच्या विरोधात फास आवळला असून त्यासंबंधी पोलीस आणि अन्न व भेसळ प्रशासनाला कडक कारवाईचे निर्देश दिले आहेत, असं म्हटलं तर चुकीचं ठरणार नाही.

# महागाव ठाणेदार धनराज निळे यांची कळंब पोलीस ठाण्यात बदली; कार्यकाळाची राहणार कायम आठवण

दैनिक वादळ वार्ता

**महागाव । प्रतिनिधी**

पोलीस स्टेशनचे ठाणेदार धनराज निळे यांची प्रशासकीय कारणास्तव कळंब पोलीस स्टेशन येथे बदली करण्यात आली आहे अल्पकालावधीतच आपल्या प्रभावी कामकाज कर्तव्यदक्षता आणि लोकाभिमुख वर्तनामुळे त्यांनी महागाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत विशेष ओळख निर्माण केली होती त्यांच्या बदलीमुळे पोलीस विभागासह सर्वसामान्य नागरिकांमध्ये हळूहळू व्यक्त केली जात आहे



धनराज निळे यांनी महागाव पोलीस स्टेशन चा पदभार स्वीकारल्यानंतर कायदा व संस्थेतील प्राधान्य देत अवैध धंद्याविरोधात कठोर मोहीम राबविली पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रातील अनेक गावांमध्ये सुरू असलेल्या विविध अवैध व्यवसायावर त्यांनी प्रभावी कारवाई करून आळा घातला त्यामुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत झाली नागरिकांमध्ये सुरक्षेतेची भावना निर्माण झाली त्यांच्या कार्यकाळात महागाव पोलीस स्टेशन अंतर्गत कोणतीही मोठी किंवा गंभीर

कायदा सुव्यवस्थेची घटना घडली नाही गुन्हेगारावर प्रभावी वचक निर्माण करण्यात यशस्वी ठरले गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीवर सतत लक्ष ठेवत त्यांनी प्रतिबंधात्मक कारवाई केल्या त्यामुळे अनेक सहभाग गुन्ह्यांना आळा बसल्याचे नागरिकाचे मत आहे धनराज निळे हे केवळ कर्तव्यदक्ष अधिकार म्हणून नव्हे तर सर्वांना सोबत घेऊन काम करणारे हसतमुख आणि सहज उपलब्ध असलेले ठाणेदार म्हणून प्रसिद्ध होते सर्व समाज घटकाशी त्यांनी सलोख्याचे संबंध प्रस्थापित केले सामाजिक धार्मिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये त्यांनी सहभाग नोंदवत नागरिकांचा विश्वास संपादन केला पोलीस विभागात प्रशासकीय बदली ही ठराविक कालावधीनंतर होणारी नियमित प्रक्रिया असली तरी एखाद्या अधिकाऱ्याने आपल्या कार्यातून जनमाणसात निर्माण केलेली छाप मात्र दीर्घकाळ स्मरणात राहते धनराज निळे यांच्या बदलीनंतर महागाव पोलीस स्टेशन तसेच परिसरातील नागरिकांना त्यांच्या कार्याची आणि नेतृत्वाची निश्चित उणीव भासणार आहे.

# चिखली तालुक्यातील ६१ ग्रामपंचायतींसाठी सदस्य आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

दैनिक वादळ वार्ता

**बुलढाणा । प्रतिनिधी**


राज्य निवडणूक आयोग यांच्या दि. २६ मे २०२६ रोजीच्या आदेशान्वये राज्यातील बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या तसेच सन २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या आणि नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्य पदांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. कार्यक्रमानुसार चिखली तालुक्यात मुदत संपणाऱ्या ६० ग्रामपंचायती व १ नवनिर्मित ग्रामपंचायत अशा एकूण ६१ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभागनिहाय सदस्य आरक्षण निश्चित करण्यासाठी विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले आहे.दि. १० जून २०२६ रोजी अमडापूर, धोत्रा नाईक, हरणी, बोरगाव काकडे, भोरसा-भोरसी, आमखेड, कवठळ, काटोडा, खैरव, रोहडा, गोद्री, माळशेंबा, पळसखेड दौलत, सोमठाणा, शेलूद, टाकरखेड हेलगा, करवंड, दहिगाव, धोत्रा भणगोजी, पेठ, टाकरखेड मु., अंत्री खेडेकर, मलगी, अमोना, वसंतनगर, शेळगाव आटोळ, मालगणी, अंत्री कोळी, सावरगाव डुकरे आणि केळवद या ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभा होणार आहे.तसेच दि. ११ जून २०२६ रोजी इसोली, तोरणवाडा, वैरागड, तेल्हारा, एकलारा, नायगाव बु., गांगलगाव, भालगाव, कोलारा, चांधई, खोर, साकेगाव, येवता, दिवठाणा, सवणा, वळती, शेलसूर, मंगरूळ नवघरे, शेलोडी, शिंदी हराळी, उत्रादा, मेरा बु., मुरादपूर, भरोसा, अंचरवाडी, मंगरूळ इ., देऊळगाव धनगर, हातणी, भोगावती, ब्रम्हपुरी आणि किन्होळा येथे विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले आहे.सदर विशेष ग्रामसभा अध्यासी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित करण्यात येणार असून, ग्रामपंचायत सदस्य पदांच्या प्रभागनिहाय आरक्षण प्रक्रियेसंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात येणार आहेत. या विशेष ग्रामसभांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आरक्षण सोडतीच्या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन तहसीलदार विजय सवडे यांनी केले आहे.

# जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचा गोदावरी पात्रातील अवैध वाळू उत्खननावर मध्यरात्री छापा;३० लाखांचा मुद्देमाल जप्त

दैनिक वादळ वार्ता

**नांदेड । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी बुधवारी (दि. ४) पहाटे १.३० वाजता पिंपळगाव निमजी येथील गोदावरी नदीपात्रात सुरू असलेल्या अवैध वाळू उत्खननावर धडक कारवाई केली. या कारवाईत दोन बोटी, २० तराफे जाळून नष्ट करण्यात आले असून सुमारे १२५ ब्रास वाळू जप्त करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची अंदाजित किंमत ३० लाख रुपये असल्याचे प्रशासनाने सांगितले.अचानक केलेल्या पाहणीत गोदावरी नदीपात्रात अवैध वाळू उपसा सुरू असल्याचे निदर्शनास आल्यानंतर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी तत्काळ तहसीलदार संजय वारकड यांना माहिती दिली. त्यानंतर तहसील कार्यालयाच्या पथकाने घटनास्थळी पोहोचून कारवाई सुरू केली. यावेळी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस





निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या पथकालाही घटनास्थळी पाचारण करण्यात आले.कारवाईदरम्यान नदीच्या दुसऱ्या बाजूने हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी लिंबगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बोधनकर यांनाही सतर्क करण्यात आले. संयुक्त पथकाने दोन बोटी व २० तराफे नष्ट करून मोठ्या प्रमाणात वाळू जप्त केली.दरम्यान, कारवाईनंतर परतत असताना शहर परिसरात अवैध वाळू वाहतूक करणारी दोन वाहनेही पकडण्यात आली. ही वाहने पुढील कारवाईसाठी वजीराबाद पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आली. तसेच घटनास्थळी आढळलेल्या चार मजुरांना पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.या मोहिमेत तहसीलदार संजय वारकड, पोलीस निरीक्षक नांदेड ग्रामीण ओमकांत चिंचोलकर, श्री केंद्रे, श्री मठवाड पोलीस उपनिरीक्षक, श्रीकृष्ण येलमटे, सय्यद मोहसीन मंडळ अधिकारी, सर्व तलाठी माधव भिसे , सरपे ,मारुती श्रीरामे , वानोळे, डॉ.जोशी मारुती कदम, राजेश बरोडा, कोतवाल बालाजी सोनटक्के इत्यादींनी सदरील कारवाई केली आहे. पोलीस व महसूल विभागाचे अधिकारी-कर्मचारी, मंडळ अधिकारी, तलाठी व कोतवाल यांनी सहभाग घेतला.अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीविरुद्ध प्रशासनाची कारवाई यापुढेही सुरू राहणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर पावले उचलली जातील, असा इशारा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिला.

# जिल्हा बँकिंग क्षेत्राची ऐतिहासिक कामगिरी; ११ हजार कोटींच्या वार्षिक ऋण आराखड्याला मंजुरी

दैनिक वादळ वार्ता

**बुलढाणा । प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला चालना देणाऱ्या जिल्हा स्तरीय समन्वय समिती (उ्‍ङउउ) आणि जिल्हा स्तरीय पुनरावलोकन समिती (DLRC) बैठकीत आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील वार्षिक ऋण आराखड्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत आगामी आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी ११ हजार १८६ कोटी रुपयांच्या वार्षिक ऋण आराखड्याला मंजुरी देण्यात आली.लीड बँक म्हणून सेंट्रल बँक ऑफ इंडियाने सादर केलेल्या अहवालानुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये जिल्ह्यातील बँकांनी निर्धारित उद्दिष्टांच्या तुलनेत उल्लेखनीय कामगिरी केली. जिल्ह्यासाठी १० हजार १०० कोटी रुपयांचे एकूण कर्ज वितरणाचे उद्दिष्ट असताना प्रत्यक्षात ११ हजार १८२ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले. त्यामुळे जिल्ह्याने १११ टक्के लक्ष्यपूर्ती करत ऐतिहासिक यश संपादन केले.कृषी मुदत कर्ज योजनेंतर्गत १ हजार ७०० कोटी रुपयांच्या उद्दिष्टाच्या तुलनेत सुमारे २ हजार ५०० कोटी रुपयांचे कर्जवाटप करून १४५ टक्के कामगिरी नोंदविण्यात आली. एमएसएमई क्षेत्रात १ हजार ९०० कोटींच्या उद्दिष्टाविरुद्ध २ हजार २९४ कोटी रुपयांचे वितरण होऊन १२१ टक्के यश मिळाले. इतर प्राधान्य क्षेत्रात ३०० कोटींच्या लक्ष्याच्या तुलनेत ४७६ कोटी रुपयांचे कर्जवाटप करून १५९ टक्के कामगिरी करण्यात आली. एकूण प्राधान्य क्षेत्रात ५ हजार ९०० कोटींच्या उद्दिष्टाविरुद्ध ६ हजार १८० कोटी रुपयांचे कर्जवाटप होऊन १०५ टक्के लक्ष्य साध्य झाले. बिगर प्राधान्य क्षेत्रात ४ हजार २०० कोटींच्या तुलनेत ५ हजार १०० कोटी रुपयांचे कर्जवाटप करून १२० टक्के कामगिरी नोंदविण्यात आली.शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतही जिल्ह्याने उल्लेखनीय यश मिळविले. महिला स्वयंसहाय्यता समूह कर्जजोडणी योजनेत १५४ कोटी रुपयांच्या उद्दिष्टाविरुद्ध २७२ कोटी रुपयांचा व्यवसाय करत १७६ टक्के यश मिळविण्यात आले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077